## अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी ०५ न्यायालय दादर, (शिवडी), मुंबई

**केस नं. ६६९२/पीएस/२०२५**

१. प्रस्तुत केस मधील आरोपी याच्या विरूध्द सिगारेट व तंबाखूजन्य उत्पादने प्रतिबंधक कायदा ६ब (२७) सह नियम ०५ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. सदरहू केसमधील आरोपी विरूध्द दोषारोपपत्र दाखल करतेवेळेस आरोपी गैरहजर होते. सदरहू केसमधील आरोपी यांनी कोर्टामध्ये हजर राहून जामीन दिलेला नाही. तसेच सदरहू केसमधील आरोपींनी केलेला गुन्हा हा रस्त्यावरील असून तो अत्यंत किरकोळ स्वरूपाचा आहे.

२. आरोपी यांच्याविरूध्द केस दाखल केल्यानंतर आरोपी यांना समन्सची बजावणी होवू शकलेली नाही. त्यामुळे सदरहू केस ही कोणत्याही प्रगतीविना पडून राहिलेली आहे. तसेच सदरहू केसमध्ये भविष्यात आरोपीचा शोध लागणे अशक्य गोष्ट आहे. त्यामुळे केसच्या स्वरूपाचा विचार करता सदरहू केस प्रलंबित ठेवणे संयुक्तीक होणार नाही.

३. त्यामुळे सदरहू केस मधून आरोपीला भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम २८१ प्रमाणे डिस्चार्ज करण्यात येत आहे व प्रकरण बंद करण्यात येत आहे.

**(अ. अ. मेहेंदळे)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : ०७/०९/२०२६.**